# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**दाखल केलेली तक्रार**

## क्र.मुमाआ/नों.क्र.६८९ /२५ /त.क्र.६१ /२६/०१

श्री.मुकेश साळुंखे

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (घ. क. व्य.) एल विभाग
बृ.मुं.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत, ल.या.मंडई,
१ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता एल विभाग
बृ.मुं.म.पा. एल विभाग यांचे कार्यालय इमारत, ल.या.मंडई,
१ ला मजला, स.गो.बर्वे मार्ग, कुर्ला (प.), मुंबई-४०० ०७०.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १०.०३.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांनी दिनांक ०७/०१/२०२५ रोजी झालेल्या सुनावणीत पारित केलेल्या आदेशात जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल केली असल्याची तक्रार केली असून त्यांच्या मूळ जोडपत्रानुसार त्यांच्या निवासस्थाना शेजारील असलेल्या कचरापेटीवर कुठलीही कार्यवाही केली नसून दिलेली माहिती ही चुकीची असल्याचा आक्षेप नोंदविलेला असून प्रस्तुत प्रकरणी तक्रारदार यांना प्रत्यक्ष कारवाईची अपेक्षा असून व **कलम १८ (१)** अन्वये दाखल केलेल्या तक्रार अर्जात असे निर्देश देणे वैधानिकरित्या शक्य नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

तथापि, तक्रारदार यांनी उपस्थित केलेला मुद्दा हा कमलाबाई चाळ, मसरानी लेन, हलावपुल, कुर्ला (पश्चिम) मुंबई-७० येथे निवासस्थाना शेजारी असलेल्या अस्वच्छ वातावरण याची विद्यमान कार्यकारी अभियंता, एल विभाग तसेच सहाय्यक अभियंता, घनकचरा व्यवस्थापन, एल विभाग यांनी प्रशासकीय पातळीवर तात्काळ दखल घेत उपरोक्त तक्रारीचे निवारण करण्यासंदर्भात प्रशासकीय पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

### आदेश

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Maharashtra ★

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १०.०३.२०२६**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**